# प्रेसनोट

दिनांक :– २२/०८/२०२३.

कौसा दिवा उप प्रभाग कार्यालय, मुंब्रा, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे लिपीक व खाजगी इसम यांना लाच स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने ताब्यात घेतलेबाबत :–

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोद कमांक | :– | मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर |
| लोकसेवकाचे / खाजगी इसमाचे नाव व कार्यालय | :– | १. श्री. गिरीष रतन अहिरे, लिपीक (वर्ग–३), कौसा दिवा उपप्रभाग कार्यालय, ठाणे महानगरपालिका, ठाणे.<br>२. श्री. असीम ईनायत शरीफ, खाजगी इसम. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ९,०००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | तडजोडी अंती ८,५००/– रुपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीत त्यांचे मुलाचे नाव टॅक्स पावतीवर समाविष्ठ करण्यासाठी तक्रारदार यांचेकडून लिपीक कौसा दिवा उप प्रभाग कार्यालय, मुंब्रा यांनी तक्रारदार यांचेकडे ९,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२/०८/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईत तक्रारदार यांनी त्यांच्या मुलाच्या नावाने नव्याने घेतलेल्या फ्लॅटचे टॅक्स पावतीवरील नावात बदल करण्याकरीता लोकसेवक गिरीष अहिरे, यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम ९,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ८,५००/– रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाल्याने ला.प्र.वि., ठाणे विभागाने लागलीच आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान् लोकसेवक गिरीष अहिरे यांचे सांगणेवरुन खाजगी इसम श्री. असीम शरीफ यांनी तक्रारदार यांचेकडून ८,५००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारले असता लोकसेवक व खाजगी इसम यांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी–** **<u>मा. श्री. सुनिल लोखंडे सो, पोलीस अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.</u>**
**<u>मा. श्री. अनिल घेरडीकर सो, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.</u>**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

| | |
|---|---|
| सपंर्क पत्ता | – ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१ |
| संकेत स्थळ | – acbmaharastra@mahapolice.gov.in |
| Email | - spacbthane@ mahapolice.gov.in |
| ॲप्लीकेशन | – acbmaharastra.net |
| टोल फ्रि नंबर | – १०६४ |
| दुरध्वनी कमांक | – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९, व्हॉटस्ॲप् कमांक – ९९३०९९७७०० |
| दिनांक | – २२/०८/२०२३. |

मा. सविनय सादर,

( विलास मते )
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे

Scanned with OKEN Scanner